# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

राष्ट्रीय महामार्ग कं ६, जळगांव. ४२५००२

दुरध्वनी कं:- ०२५७-२२८१५२२ फॅक्स कं:- ०२५७-२२८१३१९

वेबसाईट : - www.gcoej.ac.in ईमेल :- princoej@rediffmail.com


जा.क्र. शाअमज/स्थापत्य/बांधकाम/२०१२/ ७२४ दिनांक :- २७/०३/२०१२

प्रति,
मा. कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
जळगांव.

विषय : प्राध्यापक/वॉर्डन्स निवासस्थानाच्या दोन इमारतींचे बांधकाम (१६ निवासस्थाने )पूर्ण झाल्याने या इमारती ताब्यात घेणे बाबत.

संदर्भ :- उपविभागीय अभियंता बांधकाम उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांचे पत्र क्र. जा.क्र.वलि/१६५/सन २०१२, दि. १३/०३/२०१२

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयाच्या परिसरातील प्राध्यापक/ वॉर्डन्स (१६ निवासस्थाने ) निवासस्थानाच्या दोन इमारतींचे बांधकाम पूर्ण झालेले असल्याचे वरिल संदर्भानुसार उपविभागीय अभियंता सा.बां.विभाग,जळगांव यांनी कळविले आहे. सदर निवासस्थनाच्या इमारतींची महाविद्यालयाने तपासणी केली असता बरीच कामे अद्याप करणे अपूर्ण/बाकी आहे. ही कामे पूर्ण केल्याशिवाय या निवासस्थानांचा राहण्यासाठी वापर करणे शक्य होणार नाही. तरी खालील कामे पूर्ण करण्याच्या अटींच्या अधिन राहून या इमारती महाविद्यालय ताब्यात घेत असून त्याबाबतची स्वाक्षरी ताबापावतीवर करुन देण्यात येत आहे.

**या दोन इमारतीमधील अपूर्ण कामांची यादी**

**अ) शासकीय निवासस्थान इमारत क.१ (प्राचार्य निवासस्थानाजवळ )**

१) या इमारतीमधील सर्व (०८) निवासस्थानांची मुख्य दरवाजे पूर्णपणे उघडत नाहीत.
२) सर्व निवासस्थानांच्या सर्व बाल्कनीमधे पाणी बाहेर जाण्यासाठी ड्रेन पाईप तसेच संरक्षक कठडयावरील डी पाईप बसविलेले नाहीत.
३) निवासस्थानांमधील सर्व दरवाज्यांचे कडी कोंडे (Aldrop & Tadi patti) व्यवस्थित बसविलेले नाहीत.
४) दरवाज्यांच्या मागे भिंतीला/शटरला रबरी गट्टू (Rubber Gatu) बसविलेले नाहीत.
५) प्लंबिंगसाठी व विद्युतीकरणासाठी प्रत्येक निवासस्थानामधे केलेली तोडफोड पूर्णपणे बंद केलेली नाहीत.
६) काही खोल्यांची दरवाजे चौकटीच्या मापाची नसल्याने दरवाजे 4" to 8" खालून/बाजूने /वरुन उघडी आहेत.
७) बऱ्याच निवासस्थानामधील खिडक्यांच्या फ्रेम व शटर मधे मोठी पोकळी (गॅप/Gap) असल्याचे निदर्शनास आले आहे.
८) निवासस्थानामधील काही खोल्यांचे दरवाजे लाइन दोरी मधे नाहीत.
९) काही कपाटांना मजबूतीसाठी लावण्यात आलेले सपोर्ट दिसून आलेले नाहीत.
१०) बेसीन/वॉश/किचनचे ड्रेन पाइप व्यावस्थित बसविलेले नाहीत.

o/c

११) छतावर पिण्याच्या पाण्याच्या स्वतंत्र टाक्या नाहीत.
१२) छतावर २००० लि. क्षमतेच्या दोन टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत. अजून २००० लि. क्षमतेच्या दोन टाक्या बसविणे आवश्यक आहे.
१३) Septic tank व Water tank यांना बाहेरून प्लास्टर व व्यवस्थित फिनिशिंग केलेले नाही.
१४) किचनच्या सांडपाण्याचे पाइप गटारीपर्यंत चेंबर बांधून सोडलेले नाहीत.
१५) इमारतीच्या मागील Soakpit चा गडडा मुरुन/मातीने बुजविलेला नाही.
१६) इमारतीच्या चारही बाजूंनी plinth protection करण्यात आलेले नाही.
१७) पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन ची जोडणी करण्यात आलेली नाही.
१८) पिण्याच्या पाण्याच्या व सांडपाण्याच्या Demo अद्यापर्यंत दिलेला नाही.
१९) दरवाजाच्या वर बसविण्यात आलेले Tower bolt उघडत व बंद होत नाही.
२०) तळमजल्यावरील बाल्कनीमधे बाहेरून प्रवेश करणे सहज शक्य असल्याने लोखंडी ग्रीलसह संपूर्ण बाल्कनी बंद करण्यात यावी.
२१) निवासस्थानांच्या मुख्य दरवाज्यास eye piece, safety chain, Night latch बसविलेले नाहीत.
२२) इमारतीमधे Fire extinguisher बसविण्यात आलेले नाहीत.
२३) प्रत्येक निवासस्थानामधे वॉश बेसीन च्या जवळ आरसा बसविण्यात आलेला नाही.
२४) निवासस्थान क्रमांक व इमारतीस नावे टाकणे अद्याप अपूर्ण आहे.
२५) पंप हाऊसचे कामे अजून अपूर्ण आहेत.

**ब) इमारत क्रमांक २ (प्राचार्य निवासस्थानाच्या समोरची इमारत)**

इमारत क्रमांक १ मधील अ. क्र. १ ते २५ सर्व अपूर्ण कामे इमारत क्रमांक २ साठी लागू आहेत याव्यतिरिक्त खालील अपूर्ण कामे पूर्ण करणे बाकी आहेत.

१) संडासचे Vent pipe इमारतीच्या छतापर्यंतच पोचविलेले आहेत. हे सर्व पाईप छताच्यावर अंदाजे 2 मीटर पर्यंत उंच ठेवणे आवश्यक आहे.
२) या इमारतीमधील सर्व निवासस्थानातील खोल्यांची दरवाजे/चौकटी या योग्य मापाच्या बनविलेल्या नाहीत.
३) या इमारतीमधील कोणत्याही दरवाज्यास Trowel bolt बसविलेला नाही.
४) मंजूर नकाशाची प्रत सोबत जोडण्यात आलेली नाही.

**या दोघही इमारतीमधील त्रूटी या गंभीर स्वरूपाच्या आहेत. यासाठी या दोघ इमारतींची सार्वजनीक बांधकाम विभागातील गुणवत्ता तपासणी पथकाकडून तपासणी करून घेण्यात यावीत व त्रूटींची पूर्तता करण्यात यावी.**

सोबत :- ताबापावती (०६ प्रतीमधे)

(डॉ. आर. पी. बोरकर)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव.

O/C
28/3.
27/3/2012

प्रत : उपविभागीय अभियंता, बांधकाम उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव.

जा.क्र.वलि/ ९६५ /सन २०१२
उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय
बांधकाम उपविभाग, जळगांव
दिनांक : 13/3/2012

प्रति,
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
जळगांव

**विषय :-** **जळगांव येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यलाय जळगांव करीता वॉर्डन्स / प्राध्यापकांकरीता १६ निवसस्थाने बांधका करणे. (२ इमारती)**

**संदर्भ :-** निविदा क्र.बी-१/सीई-१ सन २००९-२०१०

विषयांकीत इमारतीचे बांधकाम रेनबो कन्स्ट्रक्शन कंपनी, धरणगांव यांनी पूर्ण केलेले असून त्याची संयुक्त पाहणी करण्यांत आलेली आहे. त्याअन्वये सदरील इमारत आपल्याकडे सुस्थितीत वापरण्यायोग्य हस्तांतर करण्यांत येत आहे.

सोबत :- २ इमारतींची ताबा पावती

**उपविभागीय अधिकारी**
**बांधकाम उपविभाग, जळगांव**

**प्रत :-** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.
सोबत :- ताबा पावती (२ इमारतींसाठी)

शासकीय अभि. महा. जळगाव
आवक क्रमांक १३३३
दिनांक २६/ ३ /२०१२

D:\PW_Divn, Jalgaon.doc

# ताबा पावती

**इमारतीचे नांव :- शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव करीता १६ शासकीय निवासस्थाने (G+३) (२ Buildings) बांधकामकरणे. ता.जि.जळगांव**

वरील पूर्ण झालेली सुस्थितीत असलेली आणि वापरास परिपूर्ण असलेली इमारत आज रोजी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ताब्यात मिळाली.

## इतर तपशिल खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कामाचे नांव | :- | शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव करीता १६ शासकीय निवासस्थाने (G+३) (२ Buildings) बांधकामकरणे. ता.जि.जळगांव |
| | व वर्ष | :- | सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२ |
| २ | अंदाजित किंमत | :- | रू.१८९.४५ लक्ष (१०.१३% below Rs.१६८.८० लक्ष) |
| ३ | योजनेचे नांव | :- | ४२०२, शिक्षण, कला, क्रिडा व संस्कृती यावरील भांडवली खर्च ०२-तंत्रशिक्षण, १०५ अभियांत्रिकी / तंत्रमहाविद्यालय व संस्था - इमारती पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना इमारती प्रमुख बांधकामे |
| ४ | प्रशासकीय मान्यतेचा क्र. | :- | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क.जीईसी-२००३/१९९/ तांशि-१ मंत्रालय मुंबई दि.१२/९/२००३. |
| ५ | तांत्रिक मान्यता क्रमांक | :- | Sr.No.OW/Bldg/For २००८-०९ पत्र जा.क्र.साबांमंज/ प्रशा-१/ ६९७२/२००८ दि.१३/१०/२००८ |
| ६ | कामाचे आदेश :- | :- | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,जळगांव यांचे आदेश जा.क्र.जेएएल/लेखा/निविदा/ २७३८/२००९ दि.१८/५/२००९<br>निविदा क्र.बी-१/सीई-१ सन २००९-१० |
| ७ | ठेकेदाराचे नांव | | रेनबो कन्स्ट्रक्शन कंपनी, धरणगांव ता.धरणगांव जि.जळगांव |
| ८ | काम पूर्ण झाल्याची तारीख | :- | /१/२०१२ |

**बांधण्यांत आलेल्या दोन्ही इमारतीचा तपशिल प्रकार (G+३) खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| बांधण्यांत आलेल्या इमारतीच्या जोत्याचे क्षेत्रफळ (चौ.मि.) | :- | एक इमारतीसाठी<br>GF १९९.००९<br>FF १९३.७९९<br>SF १९३.७९९<br>TF १९३३.७९९<br>Total two bldgs. = १५६०.८१२ Sqmt |
| खोल्यांची मापे | :- | सोबत जोडण्यांत आलेल्या नकाशाप्रमाणे. |
| जोत्याचा बांधकामाचा प्रकार | :- | आर.सी.सी. एम-२० ग्रेड काँक्रिट (open foundation) |
| इमारतीचा सांगाडा | :- | आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर M-२० ग्रेड काँक्रिटमध्ये |

| | | |
|---|---|---|
| | इमारतीचे छत | :- आर.सी.सी. स्लॅब, M-२० ग्रेड कॉंक्रिट सोबत जलप्रतिबंधक उपाययोजना |
| | बाहेरील भिंती व मुख्य भिंती | :- २३ से.मी. जाड फ्लाय ॲश विट बांधकाम. |
| | आतील भिंती | :- १५ से.मी. जाड भिंती, संडास व बाथरूमकरीता |
| | प्लॅस्टर | :- आतील भिंतींना १२ मी. जाड सिंगल कोट प्लॅस्टर निरू फिनीशींगसह आणि भिंतींना व इमारतीस बाहेरून सँडफेस्ड प्लॅस्टर |
| ९ | खोल्याच्या तळफरशी | :- i) किचन व मीटर रूम, जिना व त्याचे लँडींगला पॉलीमर कोटा स्टोन |
| | | :- ii) लिव्हींग रूम, डायनिंग रूम, पॅसेज, टॉयलेट ब्लॉक व स्टेअरकेस हॉलकरीता सिरॅमीक फरश्या |
| | | :- iii) संडास व बाथरूमच्या Dado सिरॅमीक फरशीचा |
| १० | रंगकाम | :- i) इमारतीच्या सर्व खोल्यांना आतील ऑईल बाऊंड डिस्टेंपर |
| | | :- ii) खिडक्यांना सिन्थेटीक इनॅमल रंग |
| | | :- iii) इमारतीस बाहेरील बाजूने वॉटरप्रुफ सिमेंट पेंट |
| ११ | दरवाजे | :- i) दरवाज्यांच्या फ्रेम c.c. M-४० grade कॉंक्रिटच्या. |
| | | :- ii) एका फडक्याचा पार्टीकल बोर्ड पॅनलींगचा दरवाजा सर्व खोल्यांना |
| | | :- iii) संडास व बाथरूमकरीता फायबर रेनफोर्सचा सिंगल फडक्याचा दरवाजा (FRB) |
| १२ | प्लंबींग व सॅनिटरी कामे | :- i) PVC plumbing pipes आणि G.I. pipes |
| | | :- ii) "Orrissa type" W.C. pan and European W.C. pan for morter bed. |
| | | :- iii) PVC pipes for drainage downtake |
| १३ | बाहेरील पाणी सप्लाय | :- i) बाहेरून नगरपालिकेचे पाण्याची नळजोडणी व परिसरातील बोरींगच्या पाण्याची जोडणी |
| | | :- ii) गच्चीवर ४ सिन्टेक्स पाण्याच्या टाक्या प्रत्येकी १००० लिटरची (एक इमारतीसाठी) |
| १४ | बाहेरील सांडपाणी व संडासचे पाणी वाहून जाणारी व्यवस्था | :- युपीव्हीसी पाईप लाईन सोबत इन्स्पेक्शन चेंबरसह आणि सेप्टीक टँक व पिण्याचे पाणी व साठवून ठेवणारे पाण्याची टाकी (अंदाजे ४०००० लिटर दोन्ही इमारतीसाठी) पंपहाऊससह. |
| १५ | शेरा | :- आज रोजी दोन्ही इमारती उपभोक्ता विभागास सुस्थितीत ताब्यात देण्यांत आल्यात. |

| | |
|---|---|
| **ताब्यात देणार** | **ताब्यात घेणार** |
| **उपविभागीय अधिकारी** | **प्राचार्य** |
| **बांधकाम उपविभाग जळगांव** | **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव** |

O/C

२७/३/२०१२

२८/३